खान्देश प्रभात

RNI No. :- MAHMAR/2020/79469

* संपादक :- हेमंत सुरेश पाटील *

वर्ष - २ अंक - ९ बुधवार १५/९/२०२१ किंमत ४ रुपये पाने ४

पीडितेच्या मुलांना वाऱ्यावर सोडणार नाही –मुख्यमंत्री उध्दव ठाकरे

वृत्तसंस्था/मुंबई - साकीनाका येथे महिलेवरील बलात्कार आणि त्यानंतर तिच्या झालेल्या मृत्यू प्रकरणी एकूणच पोलिसांनी त्वरेने सुरु केलेल्या तपासावर राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने समाधान व्यक्त केले आहे. राज्य शासन याप्रकरणी संपूर्ण न्याय देईल असा विश्वास व्यक्त करताना आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी या घटनेत राजकारण आणता कामा नये, असे देखील स्पष्ट केले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांना या घटनेच्या अनुषंगाने स्वत: चर्चे साठी बोलावून या घटनेकडे राज्यशासन गांभीर्याने पहात असून पीडीतेच्या कुटुंबास योग्य तो मोबदला देण्यात येईल व तिच्या मुलांच्या पालनपोषणाची जबाबदारी देखील पार पाडण्यात येईल, पीडितेच्या मुलांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी आयोगाला दिली.

मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, पीडित महिलेच्या मुलांना, परिवारास महिला बाल कल्याण विभागाच्या मनोधैर्य योजनेतून तसेच सामाजिक न्याय विभागाच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये आर्थिक सहाय्य तातडीने दिले जाईल. या महिलेच्या मुलांच्या शिक्षण व पालन-पोषणाच्या बाबतीतही संबंधित विभागांना वेगाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिल्याचे आयोगाच्या उपाध्यक्षांना सांगितले. ज्या निराश्रित व अनाथ महिला रस्त्यांवर राहतात त्यांच्यासाठी राज्य सरकार व केंद्र सरकार मिळून घरकूल योजना सुरू करता येते का यासंदर्भात विचार करता येवू शकतो. यासंदर्भात आयोगाने अशा स्वरुपाची योजना आखण्याविषयी केंद्र शासनास सूचना करावी असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी, ही घटना घडताच अवघ्या काही वेळात पोलिसांनी धाव घेतली व महिलेस मदत केली. त्याचप्रमाणे पुढे देखील वेगाने तपास करुन आरोपीस अटक केली याविषयी समाधान व्यक्त केले. पोलिसांना धन्यवाद देवून ते म्हणाले, पिडीत महिलांना आपण न्याय देवू शकतो हे दाखविण्यासाठी प्रशासनाने चांगली पावले उचलली आहेत. आता लवकरात लवकर खटला जलदगती न्यायालयात उभा करुन गुन्हेगारास फाशीची शिक्षा द्यावी जेणेकरुन गुन्हेगारांना धाक राहील. सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीत

(उर्वरित पान ३ वर)

भविष्यातील रोजगाराच्या संधी'

१६ सप्टेंबरला ऑनलाईन मार्गदर्शन सत्राचे आयोजन

जळगाव, (जिमाका) - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जळगाव व मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, जळगाव यांचे संयुक्त विद्यमाने अप्रेंटिसशिप आय.टी.आय, डिप्लोमा, डिग्री पास तरुणांसाठी ऑनलाईन मार्गदर्शन सत्राचे गुरुवार, दिनांक १६ सप्टेंबर, २०२१ रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत आयोजन करण्यात आले आहे.

या मार्गदर्शन सत्रात श्री. पी. व्ही. पाटील, कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार, मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, जळगाव यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

या मागदर्शन सत्रात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक व युवतींनी खालील लिंकव्दारे सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागातर्फे करण्यात आले आहे.

खालील लिंकव्दारे सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा,

गुगल मिट लिंक - https://meet.google.com/eep-kpvz-awp

वाघूर नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

जळगाव (जिमाका वृत्तसेवा) : वाघूर धरणाची जलपातळी आज दुपारी तीन वाजता २३३.७९ मीटर झाली आहे. वाघूर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात जोरदार पाऊस सुरू असल्याने धरणाची पाणी पातळी सातत्याने वाढत आहे. येत्या २४ तासांत वाघूर धरणातील जलसाठा पूर्ण होण्याची शक्यता असल्याने धरणातून वाघूर नदीच्या पात्रात पाण्याचा विसर्ग सोडण्याची कार्यवाही होवू शकते. त्यामुळे वाघूर धरणाखालील नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्क राहून सावधानता बाळगावी, असा इशारा कार्यकारी अभियंता, जळगाव पाटबंधारे विभाग, जळगाव यांनी दिला आहे.

नदीपात्रामध्ये गुरेढोरे सोडू नये अथवा प्रवेश करू नये, असेही कार्यकारी अभियंता, जळगाव पाटबंधारे विभाग, जळगाव यांनी कळविले आहे.

एकोपा हा गावाच्या विकासासाठी दिशादर्शक : ना. गुलाबराव पाटील

पालकमंत्र्यांच्याहस्ते बांभोरी परिसरात विकासकामांचे भूमिपूजन

धरणगाव (प्रतिनिधी) - गावात एकोपा असल्यास तो विकासासाठी दिशादर्शक ठरत असतो, राजकारणाच्या ठिकाणी राजकारण हे अवश्य असावे. मात्र याचा विकासावर विपरीत परिणाम होता कामा नये असे प्रतिपादन पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले. ते तालुक्यातील बांभोरी प्रचा येथे विविध विकासकामांच्या भूमिपुजनाच्या प्रसंगी बोलत होते.

तालुक्यातील बांभोरी प्र.चा. येथे आज पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्याहस्ते विकासकांमांचे भूमिपुजन करून उदघाटन करण्यात आले. या प्रामुख्याने तालुक्यातील बाभोरी प्रचा येथे २५१५ अंतर्गत स्मशान भूमी परिसरात पेव्हर बसविणे- ६ लक्ष, भोकणी येथे गावं अंतर्गत नवीन गटार बांधकाम करणे - ३ लक्ष, नवीन स्मशान भूमी बांधकाम -३ लक्ष, भोंकणी ते बाभोरी प्रचा रस्ता डांबरीकरण -१३ लक्ष अश्या २५ लक्ष निधीच्या कामांचे भूमिपूजन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते विधिवत

(उर्वरित पान ३ वर)

शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी 30 सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

जळगाव (जिमाका वृत्तसेवा) : भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृती, शिक्षण फी, परीक्षा व इतर शैक्षणिक योजनेंतर्गत अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी संकेतस्थळावर शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या संकेतस्थळावर शिष्यवृतीचे अर्ज भरण्यासाठी ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, असे समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त योगेश पाटील यांनी प्रसिध्दीस दिलेल्या शासकीय पत्रकान्वये कळविले आहे.

कोविड-१९ विषाणूच्या संसर्गामुळे काही महाविद्यालये बंद आहेत. ऑनलाइन पध्दतीने अभ्यासक्रम शिकवला जात आहे. त्यामुळे विद्यार्थी महाविद्यालयात उपस्थित राहत नाही. त्यामुळे शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज सादर केले नाहीत. विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेले नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने मुदतवाढ दिली आहे.

राज्यातील विविध महाविद्यालयामध्ये सन २०२०-२१ मध्ये प्रवेश घेतलेल्या व शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज तत्काळ https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाइन सादर करावेत.

जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करावी. महाविद्यालयांनी महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असणारे अर्ज तत्काळ ऑनलाइन प्रणालीतून संबंधित जिल्ह्याचे सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाकडे वर्ग करावेत, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री. पाटील यांनी कळविले आहे.

संपादकीय...

समाजहिताला अधिक प्राधान्य देण्याची गरज

देशात मागील वर्षाच्या शेवटी कोरोना संपेल असे समजून आणि बेसावध राहून पाच राज्यातील विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या. त्याचसोबत केंद्र सरकार, उत्तर प्रदेश सरकारने कुंभमेळ्याला देखील परवानगी दिली. त्यामुळे तिथे मोठी गर्दी निर्माण झाली होती. निवडणूक प्रचारसभांमुळे देखील मोठी गर्दी उसळत होती. पुढे यावरून उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगावर ताशेरे ओढले होते. आता देशात कोरोनाच्या दुस?्या लाटेचा हाहाकार सगळीकडे झाला असताना खरे तर राजकीय पक्षांनी याकडे दुर्लक्षच केलेले आहे. त्यांनी आपला निवडणूक प्रचार जोरात चालवला होता.

याचवेळी महाराष्ट्रातून कोरोनाचा जोर ओसरेल असे वाटत असताना कोरोनाने पुन्हा मोठी उसळी घेतली होती. त्यामुळे कोरोनाग्रस्त रुग्णांची संख्या झपाट्याने वाढत होती. यावर्षी कोरोनाची लागण झालेल्या रुग्णांना मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनची गरज पडू लागली. ऑक्सिजन नसल्यामुळे अनेकांनी मृत्यू होऊ लागला. आता ऑक्सिजन उपलब्ध होण्यासाठी ठिकठिकाणी ऑक्सिजन प्लांट उभारण्याची सरकारची धडपड सुरु आहे. रुग्णांचा जीव वाचवण्यासाठी रेमडेसिवीर इंजेक्शन मिळवण्यासाठी लोकांच्या लांबच लांब रांगा दिसतात. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तिस?्या लाटेचा सामना करण्यासाठी तयारी करण्याचे आवाहन केले आहे. कोरोनाची लस घेण्यासाठी लोकांची मोठी गर्दी होताना दिसते. पण लसीकरण केंद्रावर लसीचा मोठ्या प्रमाणात तुटवडा असल्यामुळे लोकांना लस कमी पडत आहे. लसींची कमतरता भासत असल्यामुळे लोकांच्या मनातील राग वाढत आहे. पण एकमेकांना सत्तेतून खाली खेचण्यामध्ये निवडणूक घेण्यात ही राजकीय मंडळीचे लस उपलब्ध करण्याकडे दुर्लक्ष होत आहे. कोरोनाला आटोक्यात आणण्यासाठी देश-विदेशात लसी निघाल्या आहेत. पण त्याचवेळी प्रसंगी समाजहित विसरून निवडणुकांसाठी राजकीय नेत्यांना कोरोनाला रोखणारी लस कधी तयार होणार हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्ह्यातील १० गावांमध्ये राबविलेल्या केंद्र पुरस्कृत योजनांचा घेणार आढावा

जळगाव (जिमाका वृत्तसेवा) : केंद्र सरकारच्या माध्यमातून जळगाव जिल्ह्यात सुरू असलेल्या विविध योजनांचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्या जयपूर येथील राष्ट्रीय सनियंत्रण संस्था भारती विकास संस्थेतर्फे मनोज दीक्षित व श्रीमती मोनिका हे जळगाव जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले आहेत. त्यांच्या उपस्थितीत आज सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हाधिकारी अभिजित राऊत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पंकज आशिया, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे (भूसंपादन), कृषी उपसंचालक अनिल भोकरे, उपजिल्हाधिकारी प्रसाद मते (रोहयो), जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डिगंबर लोखंडे (ग्रामपंचायत), भूमीअभिलेख विभागाचे अधीक्षक श्री. मगर, तहसीलदार जितेंद्र कुवर, बोदवड, चोपडा, पाचोरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, जिल्हा नियोजन कार्यालयातील लेखाधिकारी कैलास सोनार आदि उपस्थित होते.

श्री. दीक्षित यांच्या नेतृत्वाखालील समिती २० सप्टेंबर, २०२१ पर्यंत जळगाव जिल्ह्यातील विविध दहा गावांना भेटी देवून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोती अभियान, एनएसईपी, आजिविका, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजना, भूमीअभिलेख, संसद आदर्श ग्राम योजना आदी योजनांचा आढावा घेतील. तसेच लाभार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. ही समिती भडगाव तालुक्यातील कोळगाव, पिचर्डे, कोठली, पाचोरा तालुक्यातील लोहटार, जामनेर तालुक्यातील खातगाव, माळपिंप्री, बिलवाडी आणि बोदवड तालुक्यातील जलचक्र, साळशिंगी, शिरसाळे या दहा गावांना भेट देवून पाहणी करणार आहे, असे समितीचे समन्वय अधिकारी श्री. लोखंडे यांनी कळविले आहे.

कृषी मंत्री दादाजी भुसेंनी केली जामनेर तालुक्यातील नुकसानग्रस्त भागाची पाहणी

जळगाव (जिमाका) - पर्यावरणातील बदल आणि ढगफुटीसारख्या नैसर्गीक आपत्तीमुळे शेतातील पिकांचे होणारे नुकसान दुर्दैवी बाब आहे. शेतक-र्यांना त्यांच्या पीक विम्याचा मोबदला तातडीने मिळावा यासाठी कृषी व महसुल विभागाने सहकार्य करण्याच्या सुचना कृषी मंत्री दादा भुसे यांनी आज दिल्यात.

मंत्री श्री. भुसे यांनी आज जामनेर तालुक्यातील ओझर, हिंगणे व सामरोद शिवारातील पिकांच्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर शेतक-र्यांशी संवाद साधला.

जामनेर तालुक्यातील काही गावात चार दिवसापूर्वी झालेल्या चक्री वादळामुळे शेतीचे व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहेत. ओझर येथे घरावरील पत्रा उडून बैलावर पडल्याने बैल गंभीर जखमी झाला होता. मंत्री श्री. भुसे व आमदार किशोर पाटील यांनी आज बैल मालक श्री. रमेश माळी यांची भेट घेतली. पशु वैद्यकीय अधिका-र्यांनी ३० टाके घालुन बैलाचे प्राण वाचविले. बैलाच्या उपचारावर होणारा खर्च शासन करेल असेही त्यांनी सांगितले.

यावेळी मंत्री श्री. भुसे यांनी तहसीलदार अरुण शेवाळे, तालुका कृषी अधिकारी ए बी चोपडे यांना नुकसानीचे पंचनामे, तातडीची मदत व पिक विम्याबाबत सुचनाही दिल्यात.

कृषी मंत्री भुसेंची संवेदनशीलता

राज्याचे कृषी मंत्री दादाजी भुसे हे तसे संवेदनशील मनाचे. मग, ते शेतकऱ्याच्या शेतात जावून त्याच्याशी संवाद साधणे असो, शेतकऱ्यांसोबत नांगरणी, पेरणी असो वा शेतमजुराच्या चंद्रमौळी झोपडीत जावून झुणका-भाकरीचा आस्वाद घेणे असो. अशा प्रत्येक घटनेतून कृषी मंत्री श्री. भुसे यांचे संवेदनशील मन दिसून येते.

अशीच आणखी एक घटना आज दुपारी घडली. जामनेर तालुक्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या वादळी पावसात घरावरील पत्रे उडून बैल जखमी झाला होता. या बैलाला पशुवैद्यकांनी ३० टाके घालून त्याचे प्राण वाचविले. ही घटना आज चाळीसगाव, भडगाव आणि पाचोऱ्याच्या दौऱ्यावर असलेल्या श्री. भुसे यांना समजली. हा दौरा संपल्यानंतर त्यांनी तेथूनच ओझर, ता. जामनेर येथे जाण्याचे ठरविले. या भागातील नुकसानीची पाहणी करून ते थेट बैल मालक शेतकरी रमेश भगवान माळी यांचे घर गाठले. तेथे त्यांनी या बैलाच्या प्रकृतीची माहिती शेतकरी श्री. माळी यांच्याकडून घेतली. तसेच या बैलाच्या उपचाराचा सर्व खर्च शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल, असे मंत्री श्री. भुसे यांनी सांगत शेतकरी श्री. माळी यांना दिलासा दिला.

कृषिदूताकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आसोद्यात झाला कार्यक्रम, शेतीविषयी दिल्या टिप्स

जळगाव - महात्मा फुले कृषी विद्यापीठांतर्गत कृषी पदविका अभ्यासक्रमाच्या कृषीदूत विद्यार्थांनी शेतकऱ्यांना विविध विषयावर मार्गदर्शन केले. कृषीदूत दर्शन भोळे यांनी कोवीड लसीकरण जनजागृती व शेतावर जाऊन बीजप्रक्रिया, माती परीक्षण, एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन, चारा प्रक्रिया, पाणी व्यवस्थापन, फवारणी करतांना घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले. या वेळी भास्कर महाजन, प्रदीप भोळे, राजेंद्र सावदेकर, चिंतामण

भोळे, गिरीश महाजन, गणपत बारी आदी शेतकरी उपस्थित होते. प्राचार्य डॉ.डी. आर. पाटील, कार्यक्रम समन्वयक प्रा. सुरज चांदूरकर, कार्यक्रम अधिकारी प्रा. राहुल पाटील यांनी मार्गदर्शन केले.

गौरी गणपतीचे घराघरात भक्तीमय वातावरणात पुजन

जळगाव - गणरायाच्या आगमना नंतर दोन दिवसांनी गौराईचे आगमन होते. यावेळी घराघरांमध्ये भक्तीमय वातावरणात गौराई चे स्वागत करण्यात येते. दरम्यान आकर्षक सजावट करून गौरीची स्थापना केली जाते. विषेशतः महिला वर्गात यावेळी उत्सवाचे व आनंदाचे वातावरण असते. तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात गौराईचे मनोभावे पूजन करण्यात येऊन आपल्या परिवाराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात येते.



भुसावळ शहरातील अनिल मधुकर कुलकर्णी यांच्या कडे गौरी गणपतीचे मोठ्या उत्साहात आगमन झाले. ज्येष्ठा-कनिष्ठा गौरींची चौरंगावर स्थापना करण्यात आली असून सुंदर सजावट करण्यात आली आहे. दरम्यान सोळा भाज्या व पंचपक्वांन्नाचा नैवेद्य गौराईला दाखविण्यात आला. तीन दिवस चालणाऱ्या या गौराई उत्सवासंदर्भात अनघा कुलकर्णी यांनी माहिती दिली.

त्याचप्रमाणे जळगावातील व्यवसायिक प्रकाश मुळे यांच्या घरी देखील गौराईचे उत्साहात आगमन झाले. दरम्यान मुळे परिवाराच्या वतीने गौराईसाठी आकर्षक अशी सजावट करण्यात आली. दरम्यान याप्रसंगी मनोभावे पूजन करून आरती करण्यात आली. यावेळी गोड पदार्थांचा नैवेद्य गौराईला देण्यात आला.

तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात घरात आनंद उत्सहाचे वातावरण असते, आमच्या सासूबाईंकडे असलेल्या गौराई आता आमच्याकडे आल्या असून, आम्ही ही परंपरा अखंडितपणे सुरू ठेवली असल्याचे वनिता मुळे यांनी सांगितले. महालक्ष्मी ने दिलेला वसा माझ्या सूना, मुलं कधीच टाकणार नाही असा विश्वास प्रकाश मुळे यांच्या आई कुसुम मुळे यांनी व्यक्त केला.

कोरोना योद्ध्यांना शासकीय सेवेत सामावून घ्या, अन्यथा आंदोलन उभारणार.. - मुकूंद सपकाळे

जळगाव - कोरोना महामारीत संपूर्ण जग भीतीच्या सावटाखाली असताना स्वतःच्या जीवाची पर्वा न करता शासकीय रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने सेवा बजावणारे डॉक्टर्स, नर्स, वॉर्डबॉय, डाटाएन्ट्री ऑपरेटर, सुरक्षा रक्षक इत्यादी कोरोना योद्ध्यांना शासकीय सेवेत कायम करण्यात यावे. या मागणीसाठी लढा उभारण्याचा निर्णय, जळगावातील अजिंठा शासकीय विश्रामगृह येथे झालेल्या कोरोना योद्ध्यांच्या बैठकीत घेण्यात आला.

दरम्यान आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात मंगळवार दिनांक १४ सप्टेंबर रोजी सर्व कोरोना योद्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आपल्या मागण्यांसाठी धरणे आंदोलन करणार आहेत.

बैठकी प्रसंगी महाराष्ट्र जनक्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मुकुंद सपकाळे यांनी कोरोना योद्धयांना मार्गदर्शन करताना सांगितले की, कोरोना काळात आमदार, खासदार,मंत्री, लोकप्रतिनिधी जिवाच्या भीतीने घरी बसले असताना कोरोना रुग्णांच्या सेवा शुश्रुषा करणारे शासकीय रुग्णालयातील कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कोरोना योद्ध्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय शासनाला घेण्यास भाग पाडू.

संविधान जागर समितीचे संयोजक भारत ससाणे यांनी न्याय हक्कासाठी कोरोना योद्धयांनी संघटीतपणे आंदोलन करण्याची वेळ येऊन ठेपली असून आरोग्य विभागात अनेक पदे रिक्त असल्याने या पदावर कोरोना योद्धयांना सामावून घेतले पाहिजे. यासाठी आंदोलनाच्या माध्यमातून शासनावर दबाव टाकावा लागेल.

छावा मराठा युवा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अमोल कोल्हे, हरिश्चंद्र सोनवणे, इंजि.एच.एच. चव्हाण यांनीही आपले विचार व्यक्त केले. प्रहार जनशक्ती पक्षाचे युवक महानगराध्यक्ष निलेश बोरा यांनी प्रास्ताविक केले. यावेळी चंदन बिऱ्हाडे, भारत सोनवणे, सुधाकर पाटील, सतीश सुर्वे यांच्यासह कोमल बिऱ्हाडे, प्रिया वाघ, अक्षय जगताप, बापूसाहेब पाटील, कुवरसिंग पावरा, युवराज सुरवाडे, भाग्यश्री चौधरी, प्रतीक्षा सोनवणे, शिला सपकाळे, दिपाली भालेराव, ऐश्वर्या सपकाळे, मंदाकिनी विंचूरकर, मो.आमिर शेख, निशा तापकिरे, जयवंत मराठे, जितेंद्र चौधरी, कृष्णा सावळे, सुनील परदेशी, डॉ. प्रसन्न पाटील, गणेश सोनवणे, नदीम बेग, दानिश बागवान, पवन पाटील, मनोज सावकारे, चंद्रशेखर पाटील, समाधान शिंगटे, प्रशांत नेवे, किशोर भोई यांच्यासह जिल्हाभरातील कोरोना योद्धे उपस्थित होते.

पान १ वरुन...

पीडितेच्या मुलांना वाऱ्यावर .....

गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, मुख्य सचिव सीताराम कुंटे, पोलिस महासंचालक संजय पांडे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, सामाजिक न्याय विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अरविंद कुमार, महिला बाल कल्याण विभागाच्या सचिव आय. एस. कुंदन, पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, सह पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, मिलिंद भारंबे आदिंची उपस्थिती होती. पोलिस आयुक्त हेमंत नगराळे म्हणाले, ही घटना कळता क्षणी दहा मिनिटात पोलीस घटनास्थळी पोहचले, एवढेच नाही तर जखमी अवस्थेत पडलेल्या महिलेस स्वत: टेम्पो चालवत पोलीसांनी तिला रुग्णालयात पोहोचवले. मुख्यमंत्री ठाकरे यांनी तातडीने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेवून विशेष सरकारी अभियोक्ता यांची हा खटला न्यायालयात उभा राहण्याअगोदरच नियुक्ती करण्यात यावी असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे प्रसिद्ध वकील राजा ठाकरे यांची तातडीने नियुक्ती करण्यात आल्याची माहिती देखील यावेळी पोलीस आयुक्तांनी दिली, यावर आयोगाचे उपाध्यक्ष अरुण हलदार यांनी समाधान व्यक्त केले. ही घटना सीसीटिव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे. मुंबई शहरात ५ हजार सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून ७ हजार कॅमेरे बसविणे सुरु आहे अशी माहिती देवून सह पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील म्हणाले की, शहरातील सर्व मॉल्स, संस्था, दुकाने यांना रस्त्याच्या दिशेकडील कोनात कॅमेरे बसविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अशारीतीने शहरात सुमारे ५० हजारापेक्षा जास्त कॅमेरे कार्यरत आहेत, अशी माहिती त्यांनी दिली.

एकोपा हा गावाच्या विकासासाठी.....

पूजा करून करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचा सत्कार केला.

याप्रसंगी ना. गुलाबराव पाटील म्हणाले की, जिल्हा परिषदेकडील बांभोरी - भोकणी - आव्हाणी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करून रुंदीकरण करण्याबाबत कार्यवाही च्या सूचना संबंधित अधिकारी यांना देण्यात आल्या आहेत. हा शेतकऱ्यांचा प्रलंबित विषय मार्गी लावणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. तर बांभोरी प्रचा आणि परिसरात विकासकामांचे नवीन पर्व सुरू झाले असून येत्या काळात परिसरात सर्वांगीण विकास साधण्यात येणार असल्याचा आपला संकल्प असून आजचे भूमिपुजन हे याच दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल असल्याचे प्रतिपादन ना. गुलाबराव पाटील यांनी याप्रसंगी केले.

याप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य प्रतापराव पाटील, विधानसभा क्षेत्र प्रमुख संजय पाटील, सरपंच संघटनेचे जिल्हा अध्यक्ष सचिन पवार , माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, भिकन नन्नवरे, उपसरपंच तुळसाबाई नन्नवरे , माजी सरपंच ईश्वर नन्नवरे, ग्रा. प . सदस्य हिरामण नन्नवरे, नरेंद्र पाटील, पांडुरंग हिवरकर, सदाशिव पाटील, महेंद्र नन्नवरे, सुनिल नन्नवरे, धनराज साळुंके, चंदन कळमकर, मंडळ अधिकारी अमोल पाटील, ग्रामविकास अधिकारी डी. डी. पाठक, शाखा अभियंता एस. ए. सपकाळे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी व ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

तीन महिन्यात आरक्षण द्या, अन्यथा परिणाम भोगा - बावनकुळे

मुंबई - संविधानाप्रमाणे निवडणूक आयोगाला निवडणूका घ्याव्या लागतात, पण राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणूका पुढे ढकलू असं म्हणत, राज्यातील ओबीसी जमतेची दिशाभूल केलीय. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वांझोट्या बैठका घेतल्या, आणि वेळकाढू पणा केला. आता सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे सरकारला झटका दिला, निवडणूका पुढे ढकलण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली.

त्यामुळे आता ओबीसी जनतेला न्याय मिळेल की नाही, हा प्रश्न आहे. पण आताही तीन महिन्यात इम्पेरीकल डाटा गोळा करुन, ओबीसींना आरक्षण द्यावं, नाही तर राज्यातील ओबीसी समाज या सरकारच्या मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही आणि भाजप या सरकार विरोधात तिव्र आंदोलन करणार असा इशारा भाजपचे प्रदेश सरचिटणीस चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला.

शहरातील मुख्य रस्त्यांवरील खड्ड्यांची डागडूजी सुरू

जळगाव - शहरातील मुख्य रस्त्यांवर काही दिवसांपासून मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. त्यात पावसाळा असल्याने पादचाऱ्यांसह नागरिक व वाहनचालकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. यासंदर्भात जळगावकर नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात महापालिकेसह महापौर, उपमहापौरांकडे तक्रारी येऊ लागल्या होत्या. त्याचप्रमाणे सध्या गणेशोत्सव सुरू असून साधारण दीड दिवसांपासून गणरायाचे विसर्जन सुरू होते. या पार्श्वभूमीवर शहरातील मुख्य रस्त्यांवरील खड्ड्यांची डागडूजी करण्यात येत आहे.

यासंदर्भात महापौर जयश्री महाजन व उपमहापौर कुलभूषण पाटील यांनी पाठपुरावा करून पालिका प्रशासनाने शहरातील किमान मुख्य रस्त्यांवरील त्यात डांबरी व काँक्रीटच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचा विषय गंभीरतेने घेऊन शहरातील मुख्य रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या प्रक्रियेस आठवडाभरापासून सुरूवात केली. यात सातत्याने मक्तेदारांकडून केल्या जाणाऱ्या कामांसंदर्भातील नागरिकांची ओरड लक्षात घेऊन संबंधित रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या कामासाठी महापालिका प्रशासनाने स्वतःचीच संपूर्ण यंत्रणा रस्त्यावर उतरविली आहे.

सुरूवातीला शहरातील प्रमुख रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे काम संपल्यानंतर पावसाळा संपताच इतर रस्त्यांच्या कामांनाही सुरूवात होईल. असे आश्वासन महापौर महाजन यांनी दिले. त्यासाठीही महापालिका प्रशासन व शासन दरबारी आमचा पाठपुरावा सुरू आहे, असे महापौर यांनी कळविले आहे.

युवाशक्ती व भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशनच्या गणरायाची महापौरांच्या हस्ते स्थापना

जळगाव - युवाशक्ती फाऊंडेशन व भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा होणाऱ्या गणेशोत्सवांतर्गत शहरातील काव्यरत्नावली चौकात शुक्रवारी जळगाव शहराच्या प्रथम नागरिक तथा महापौर जयश्री महाजन व महापालिकेतील विरोधी पक्षनेते सुनिल महाजन या दाम्पत्याच्या शुभ हस्ते गणरायाची विधिवत स्थापना करण्यात आली.

यावेळी उपस्थित भक्तगणांनी शासनाने घालून दिलेल्या मार्गदर्शक सूचना व नियमांचे तंतोतंत अनुपालन करत महापौर जयश्री महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतःच्या घरासह शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सदैव तत्पर राहणे, पाण्याच्या अपव्ययासह होणारी नासाडी थांबविणे, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी किमान एक झाड लावून ते दत्तक घेत त्याचे संगोपन करणे यासाठीची प्रतिज्ञा स्वयंस्फूर्तीने घेतली. त्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासाच्या स्वप्नपूर्तीकरिता सर्वांना शक्ती प्राप्तीसाठी श्रीगणेशाला साकडेही घालण्यात आले.

याप्रसंगी युवाशक्तीचे विराज कावडीया, अमित जगताप, प्रितम शिंदे, भूषण सोनवणे, पीयूष हसवाल, प्रवीण बारी, विशाल तिवारी, संदीप सूर्यवंशी, सौरभ कुलकर्णी आदींसह कार्यकर्ते व भक्तगण उपस्थित होते.

वाघूर धरणाचे जलपूजन तांबे दाम्पत्याच्या हस्ते संपन्न

जळगाव - जळगाव शहराला पाणीपुरवठा करणारे वाघूर धरण यंदा वरुणराजाच्या कृपादृष्टीमुळे १०० टक्के पूर्ण भरले आहे. त्या अनुषंगाने हिंदू संस्कृतीची जपणूक करीत कृतज्ञता म्हणून गुरुवारी धरणाचे जलपूजन करण्यात आले.

महापौर जयश्री महाजन, उपमहापौर कुलभूषण पाटील, गजानन मालपुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत जलपूजन केले. दरम्यान मेहरुण परिसरातील रहिवासी युवराज तांबे व वंदना तांबे या दाम्पत्याला जलपूजनाचा मान देण्यात आला. यावेळी तांबे दाम्पत्याने सपत्नीक साडीचोळी, श्रीफळ, पुष्पहार अर्पण करून जलपूजन केले. यावेळी महापालिकेतील पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता व केमिस्ट श्यामकांत भांडारकर, विद्युत अभियंता विलास पाटील उपस्थित होते.

याप्रसंगी तांबे दाम्पत्यासह महापौर जयश्री महाजन यांनी वाघूर धरण यापुढेही सदैव १०० टक्के भरून या धरणाच्या पाण्यावर विसंबून असलेल्या जळगाव शहरासह जामनेर, भुसावळ तसेच अन्य परिसरातील गावांना लाभ मिळू द्यावा व सर्वत्र सुख-समृद्धी नांदावी, अशी आर्त आळवणी वरुण देवता चरणी केली. वाघूर धरणाचे बांधकाम १९७८ मध्ये झाल्यापासून आतापर्यंत धरण तीन वेळा १०० टक्के भरले आहे.

राज्यात ऑगस्टमध्ये १७ हजार ३७२ बेरोजगारांना रोजगार

कौशल्य विकासमंत्री नवाब मलिक यांची माहिती

मुंबई : कोरोनाच्या संकटामुळे बेरोजगारीची समस्या निर्माण झाली असताना कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांद्वारे राज्यात विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांमध्ये ऑगस्ट २०२१ मध्ये १७ हजार ३७२ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला असल्याची माहिती या विभागाचे मंत्री नवाब मलिक यांनी दिली. महास्वयम् वेबपोर्टल, ऑनलाईन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरीइच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करुन देण्यात येतो.

अशा विविध उपक्रमांमधून मागील वर्षी २०२० मध्ये राज्यात १ लाख ९९ हजार ४८६ उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात यश आले, तर चालू वर्षात जानेवारी ते ऑगस्टअखेर १ लाख ११ हजार ०८३ बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यात आला आहे, असे मंत्री श्री. मलिक यांनी सांगितले.

मंत्री श्री. मलिक म्हणाले, बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरु केले आहे. या वेबपोर्टलवर बेरोजगार उमेदवार आपले शिक्षण, कौशल्ये, अनुभव आदी माहितीसह नोंदणी करतात. त्याचबरोबर कुशल उमेदवारांच्या शोधात असलेल्या कंपन्या, उद्योजक, कॉर्पोरेट्स हे सुद्धा या वेबपोर्टलवर नोंदणी करुन त्यांना हवे असलेले कुशल उमेदवार शोधू शकतात. नोकरीइच्छुक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागामार्फत जिल्ह्यांमध्ये वेळोवेळी ऑनलाईन रोजगार मेळाव्यांचेही आयोजन करण्यात येते.

नोंदणीकृत उद्योगांमध्ये नोकरीची संधी

विभागाकडे, महास्वयम वेबपोर्टलवर आतापर्यंत ९१ हजार ०९१ इतक्या सार्वजनिक व खाजगी उद्योजकांनी नोंदणी केली आहे. यापैकी अनेक उद्योजक आवश्यकतेनुसार त्यांच्याकडील रिक्त पदांची भरती महास्वयम वेबपोर्टल तसेच कौशल्य विकास विभागाचे ऑनलाईन मेळावे आदी उपक्रमांमधून वेळोवेळी करतात. त्यामुळे नोकरीइच्छुक उमेदवारांना कौशल्य विकास विभागाच्या उपक्रमांमधून नोकरी मिळविण्यासाठी चांगले व्यासपीठ उपलब्ध झाले आहे, असे मंत्री श्री. मलिक यांनी सांगितले.

मुंबईत ऑगस्टमध्ये ६ हजार १९० बेरोजगारांना रोजगार

मंत्री श्री. मलिक म्हणाले, माहे ऑगस्ट २०२१ मध्ये विभागाकडे ३९ हजार ५७४ इतक्या नोकरीइच्छुक उमेदवारांनी नवीन नोंदणी किंवा पुनर्नोंदणी केली आहे. यात मुंबई विभागात ९ हजार २१६, नाशिक विभागात ६ हजार १८०, पुणे विभागात १० हजार ९८०, औरंगाबाद विभागात ८ हजार १०९, अमरावती विभागात २ हजार ७४० तर नागपूर विभागात २ हजार ३४९ बेरोजगार उमेदवारांनी नोंदणी केली.

माहे ऑगस्टमध्ये कौशल्य विकास विभागाच्या विविध उपक्रमांद्वारे १७ हजार ३७२ उमेदवार नोकरीस लागले. यामध्ये मुंबई विभागात सर्वाधिक ६ हजार १९०, नाशिक विभागात २ हजार १६८, पुणे विभागात ४ हजार ६२९, औरंगाबाद विभागात ३ हजार ७३८, अमरावती विभागात ४४९ तर नागपूर विभागात १९८ इतके बेरोजगार उमेदवार नोकरीस लागले.

आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२१

१७ ऑक्टोबरपासून स्पर्धेला सुरुवात होणार

वृत्तसंस्था/नवी दिल्ली - आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२१ स्पर्धा सुरू होण्यास फक्त एक महिना शिल्लक आहे. अशा स्थितीत या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व १६ संघांनी आपल्या संघांची घोषणा केली आहे. ओमान, पापुआ न्यू गिनी, आयर्लंड, नामिबिया, बांगलादेश, स्कॉटलंड, श्रीलंका, नेदरलँड आणि आठ संघांचा समावेश असलेल्या पहिल्या फेरीच्या सामन्यांसह १७ ऑक्टोबरपासून या स्पर्धेला सुरुवात होणार आहे. अंतिम सामना १४ नोव्हेंबरला खेळला जाईल. सुपर १२ संघांचे सामने २४ ऑक्टोबर रोजी कट्टर प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील हाय व्होल्टेज सामन्याने सुरू होतील. अफगाणिस्तान, भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, वेस्ट इंडिज, दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंड या आठ संघांनी थेट सुपर १२ साठी पात्रता मिळवली आहे. सुपर १२चे सहा संघ अ आणि ब या दोन गटात विभागले गेले आहेत आणि प्रत्येक गटातील दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.

हे वृतपत्र मुद्रक, प्रकाशक, व मालक हेमंत सुरेश पाटील यांनी गौरी एंटरप्राईजेस, ८३, ए विंग, नवीन बी. जे मार्केट, जळगाव. जिल्हा जळगांव - ४२५००१ (महा.) येथे छापून प्लाट नं. १२, जय नगर, जिल्हा पेठ, जळगांव- ४२५००१ (महा.) येथे प्रसिध्द केले. संपादक :- हेमंत सुरेश पाटील, (RNI No. :- MAHMAR/2020/79469)